व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर
हेड ऑफिस ४५२, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर
Ph.: 0217-2328176, 27299972326050 •
Email: headoffice@vyaparibank.com

# स्थावर मालमत्तेच्या लिलावासाठी जाहिर सूचना

**(नियम ८ (६) पहा)**

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट २००२ तरतुदी या सिक्युरिटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६) नुसार अंतर्गत या सह वाचण्यात याव्यात.

**अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव सूचना**

सामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना या नोटिशीद्वारे सूचीत करण्यात येते की खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता ही बँकेकडे तारण ठेवली असून त्यावर सिक्युअर क्रेडिटर्स यांचा वोजा आहे. सदर स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा व्यापारी सहकारी बँक मर्यादिक, सोलापूर चे प्राधिकृत अधिकारी यांनी दि. २३/१२/२०२५ रोजी घेतला आहे. सदरची तारण मालमत्ता "जशी आहे तशी" जी 'जेथे आहे तेथे',आणि 'जशी आहे तशी' या तत्वावर विक्री केली जाणार आहे. लिलाव खाली नमूद केलेल्या लिलावाच्या अटींवर केला जाईल. सदर मालमत्ता नमूद केलेल्या राखीव किमतीच्या खाली विकली जाणार नाही.

| कर्जदाराचे नाव, हमीदार / गहाणखतदार | मागणी सूचना १३ (२) प्रमाणे | | प्रत्यक्ष ताबा | लिलाव | |
|---|---|---|---|---|---|
| | तारीख | थकबाकी रु. | | तारीख | वेळ |
| १.श्री. कुमार रमेश कोठारी (मयत) कायदेशीर वारस:- (अ).श्रीमती पूजा कुमार कोठारी (ब) श्री. सोहम कुमार कोठारी (क).श्री. प्रथमकुमार कोठारी<br>२.श्री. जयेश किशोर कोठारी (मयत) कायदेशीर वारस:- (अ) श्रीमती जागृती जयेश कोठारी (ब)श्री. जिग्नेश जयेश कोठारी (क) श्री. सागर जयेश कोठारी (मयत) कायदेशीर वारस:- (अ).श्रीमती स्वानुभूती सागर कोठारी (ब)श्री. सिद्धांत सागर कोठारी (क) श्री. रेयांश सागर कोठारी वरील सर्व कर्जदार आणि त्यांचे कायदेशीर वारस,<br>३. श्री. धर्मील दीपक कोठारी<br>जामीनदार:- मे. ए.आर. कोठारी - भागीदारी फर्म चे भागीदार :-<br>१. श्री. कुमार रमेश कोठारी (मयत) २. श्री. जयेश किशोर कोठारी (मयत) ३. श्री. अतुल किशोर कोठारी ४. श्री. धर्मील दीपक कोठारी | २२/०७/२०२५ | मुदत कर्ज रु. १४२.६६ लाख आणि मागणी नोटीस पासून देय तारखे पर्यंतच्या व्याजासह आनुषंगिक खर्च ई. | २३/१२/२०२५ | **२४/०३/२०२६** | दुपारी १.०० ते २.३० वाजेपर्यंत |
| | जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी मौजे बार्शी तालुका बार्शी, १/१४ पैकी लातूर रोड, एमआयटी कॉलेज जवळ, येथील बिनशेती मिळकत यासी गट नं. 37/38/39/40 याचे क्षेत्र 1276.00 चौ.मी. इतके आहे. यासी चतुःसिमा -<br>पुर्वेस : प्लॉट नं. 1/15 ते 1/22<br>दक्षिणेस : प्लॉट नं. 5 व 6<br>पश्चिमेस : 30 मीटर रुंदीचा रस्ता<br>उत्तरेस : 9 मीटर रुंदीचा रस्ता | | | | |

| (अ) लिलावाचे ठिकाण | (ब) राखीव किंमत (रु.) | (क) ईएमडी रु. |
|---|---|---|
| व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर ४५२, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर | रु. ७४.०८ लाख | रु. ७.४१ लाख |

*संभाव्य खरेदीदारांना त्यांच्या स्वतःच्या हितासाठी विनंती केली जाते की, बँकेला EMD ची रक्कम भरण्यापूर्वी वर नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता संबंधित वरील आणि इतर संबंधित तपशिलांबाबत स्वतःचे समाधान करावे.

लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती

संभाव्य खरेदीदारांना / सहभागींदाराना विनंती करण्यात येते की त्यांनी स्वतः ताबा हक्क, मालकी, क्षेत्र, कर, शुल्क व मालमत्तेशी संबंधित देय रक्कम इत्यादींची खात्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे EMD रक्कम भरण्यापूर्वी करावी. नंतर काही त्रुटी आढळल्यास प्राधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाही.

१) लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती बँकेच्या खालील वेबसाईट वर उपलब्ध आहेत.
https://www.vyaparibanksolapur.com

२) वृत्तपत्रात प्रकाशित केलेल्या मालमत्तेच्या संबंधीचे तपशील हे खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीच्या माहितीच्या आधारे नमूद केलेले आहेत, तथापि, या तपशीलातील कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा काही माहिती नमूद करण्याचे राहिल्यास ते जबाबदार राहणार नाहीत. प्राधिकृत अधिकारीच्या माहितीनुसार तारण मालमत्तेवर बँकेशिवाय कोणाचाही वोजा नाही तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेवर वोजा, दावे/ हक्क/देय यासंबंधी स्वतंत्र चौकशी करावी.

३) यशस्वी खरेदीदारास कायदेशीर हस्तांतरणासाठी आवश्यक देय देयके, कर, टी डी स , मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. भरावे लागतील.

४) वर नमूद केलेल्या मालमत्तेसाठी कायदेशीर / बेकायदेशीर देयके, कर, कर्तव्ये इ. ची जबाबदारी ही यशस्वी बोलीदाराची राहील.

५) खाली दर्शविलेल्या तारखेला आणि वेळेवर जप्त केलेली मालमत्ता तपासणीसाठी उपलब्ध आहे. स्थावर मालमत्ता / गहाण मालमत्तेची तपासणी करण्यात काही अडचण आल्यास किंवा अधिक माहिती करिता कृपया प्राधिकृत अधिकारी, व्यापारी सहकारी बँक लि., सोलापूर ४५२ पं. मंगळवार पेठ, सोलापूर फोन क्रमांक ०२१७-२३२८१७६ वर संपर्क साधावा.

६) राखीव किमतीच्या १०% व्यापारी सहकारी बँक लि., सोलापूर ४५२ प. मंगळवार पेठ सोलापूर येथे दि २३.०३.२०२६ किंवा त्यापूर्वी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बयाणा रकमेची ठेव (EMD) जमा करावी, "व्यापारी सहकारी बँक लि., सोलापूर ४५२ मंगळवार पेठ सोलापूर येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डरद्वारे EMD पेमेंट केले जावे. येथे विहित केलेल्या वरील तारीख आणि वेळेच्या पलीकडे प्राप्त झालेले EMD लिलाव विक्रीसाठी ग्राह्य धरले जाणार नाही आणि त्यानुसार नाकारण्यात येतील. व्यापारी बँक, सोलापूरच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वर नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेत लिलाव केला जाईल, संभाव्य खरेदीदाराने ओळखपत्र म्हणून आधार कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पॅन कार्ड सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

७) संभाव्य खरेदीदार कर्जदार, जामीनदार किंवा संबंधित स्थावर मालमत्ता / गहाण मालमत्तेचे मालक लिलाव विक्रीच्या वेळी उपस्थित राहू शकतात. सादर करावयाची बोली किंमत राखीव किंमतीपेक्षा जास्त असेल. संभाव्य खरेदीदारांना वर नमूद केलेल्या मालमत्तेसाठी ऑफर वाढवण्याची/सुधारण्याची संधी दिली जाईल. अधिक ऑफर असलेल्या खरेदीदाराने पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत ऑफर रकमेच्या २५% (जमा केलेल्या ईएमडीच्या रकमेसह) D.D./P.O. द्वारे जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा ईएमडीची रक्कम जप्त करण्यात येईल. उर्वरित ७५% रक्कम पुढील १५ दिवसांत (म्हणजे दिनांक १०/०४/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी) बँकिंग तासांमध्ये जमा करावी लागेल. जर ही रक्कम विहित वेळेत जमा न केल्यास, जमा केलेली २५% रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल आणि चूक करणाऱ्या बोलीदाराचा या संदर्भात कोणताही दावा / हक्क राहणार नाही. मालमत्ता / रक्कम लिलाव विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे.

८) वर नमूद केलेल्या राखीव किंमतीपेक्षा कमी ऑफर मिळाल्यास, लिलाव रद्द केला जाईल आणि EMD परत केले जाईल.

९) लिलावाची पुष्टी झाल्यास आवश्यक कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, टी डी एस आणि इतर खर्च जर काही असतील तर ते खरेदीदाराद्वारे भरण्यात येतील.

१०) बँकेने सर्वोच्च आणि / किंवा सर्व ऑफर स्विकारणे किंवा नाकारण्याचा, पुढे ढकलण्याचा / रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. कोणतेही कारण न देता बँकेच्या सोयीनुसार या मालमत्तेचा नव्याने लिलाव केला जाईल किंवा रद्द केला जाईल.

११) विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार / अर्जदार यांच्या नावाने जारी केले जाईल आणि इतर कोणत्याही नावाने जारी केले जाणार नाही.

१२) सदरच्या मालमत्तेची विक्री सिक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन अॅण्ड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम / शर्तीच्या अधीन असेल.

१३) स्थावर मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ २०.०३.२०२६ ते २१.०३.२०२६ वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वा.

१४) EMD जमा करण्याची तारीख २३.०३.२०२६ संध्याकाळी ५.०० वा. पर्यंत

| सरफेसी कायद्यांतर्गथ वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना |
|---|
| कर्जदार / वारसदार /जामीनदार / गहाणदार यांना या जाहीर लिलावाच्या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की त्यांनी वरील नमूद लिलावाच्या तारखेपूर्वी वर नमूद केलेली रक्कम भरावी, अन्यथा जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव केला जाईल आणि शिल्लक थकबाकी व्याजासह वसूल केली जाईल. |

दि. ०७ /०३ /२०२६
ठिकाण: सोलापूर

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

सही
प्राधिकृत अधिकारी
व्यापारी सहकारी बँक लि., सोलापूर
४५२, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर

Scanned with OKEN Scanner